नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.२९०**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०८ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - दिपक रामचंद्र राणे,
वय - ५० वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. - म्हैसवाडी, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. मी शेती करीत असून माझी चिंचोल येथे शेती आहे. त्याचा गट क्र. १०२ आहे. त्या शेताचे क्षेत्र १५ एकर असून म्हैसवाडी शिवारात माझी शेती गट क्र. २४४ आहे. त्याचे क्षेत्र ८७ आर इतके आहे. सन २०२२ मध्ये मी माझ्या शेतात कापूस, सोयाबीन व मका पेरले होते. त्यावेळी ९२ क्वींटल ६० किलो कापूस भरला होता. तो कापूस मी काट्यावर मोजला होता. तो कापूस मी जगन नारखेडे याला विकला होता. त्यावेळी जगन नारखेडेने माझ्यासोबत एका महिन्याचा व्यवहार केला होता. त्याने मला महिन्याभरात कापसाचे पैसे ९ हजार क्वींटलप्रमाणे परत करेल असे सांगितले होते. मी त्याला कापूस दि.१८.०७.२०२३ रोजी दिला. तो कापूस त्याने एका मोठ्या गाडीत नेला. तो त्या दिलेल्या कापसाचा काटा हा दसरखेड एम.आय.डी.सी. येथे केला. काटा केल्यावर गाडी खाली झाली. मला कापसाचे पैसे मिळाले नाही. ती रक्कम ८,३३,४००/- इतकी होती. काटा केल्याचे माझ्याकडे काटा पट्टी आहे. ती मी दाखल केली आहे. सदर काटेपट्टीवर माझे नाव नमुद केले आहे. सदर काटेपट्टीवर कापसाचे वजन ९२ क्वींटल ६० किलो नमूद केले आहे. सदर दस्ताला निशाणी देण्यास आरोपी क्र. १ यांच्या विद्वान वकीलांनी हरकत घेतली कारण सदर काटे पावती हा इलेक्ट्रॉनिक दस्त असून त्यास ६५ बीचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. (सदर दस्तातील मजकुराबाबत व सत्यतेबाबत सदर साक्षीदाराने काहीही कथन केलेले नाही व केवळ सदर दस्तास ओळखण्याच्या दृष्टीकोनातून निशाणी दिल्यास आरोपीचे कोणतेही नुकसान होत नाही. करिता ओळखण्याच्या दृष्टीकोनातून निशाणी देण्यात येते. सदर दस्तास **<u>निशाणी क्र. २९१</u>** देण्यात येतो.) सदर काटा पट्टी ही मला पेपर मील वाल्यांनी दिली होती. आरोपी क्र. १

कडे माझे ८,३३,४००/- रुपये देणे असून तो आज न्यायालयात हजर आहे. मला पैसे न मिळाल्यामुळे मी पोलीस स्टेशनला जबाब देण्याकरिता गेलो होतो. मी काटेपट्टी व काटेपट्टीच्या छायांकित प्रतीवर सही केली होती.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....</u>**

०२. सन २०२२-२३ मध्ये साधारणपणे १२ ते १५ क्वींटल प्रती एकरी कापूस झाला होता. तो कापूस मी साडे सात ते आठ एकर इतक्या क्षेत्रात पेरला होता. रामचंद्र काशीराम राणे हे माझे वडील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते वारले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील वारल्यानंतर माझ्यात माझा भाउ अतुल राणे, गुणवंती व आई उशा राणे यांच्यात वाटप झाले. त्या वाटपात माझ्या हिस्सयावर २ हेक्टर ५ एकर जमीन माझ्या हिस्सयावर आली. हे म्हणणे खरे आहे की, कापसाचे पीक हे सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून निघायला सुरूवात होते. तो कापसाचा हंगाम डिसेंबर महिन्यात संपतो. हे म्हणणे खरे आहे की, सप्टेंबर ते डिसेंबरच्या कालावधीमध्ये झालेला कापूस हा शेतकरी एकत्रीतपणे विकत असतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस कापूस विकत घेतल्या जातो त्यावेळेस तो कापूस मापारी हा शेतक-या व व्यापा-यासमक्ष स्वतः मोजत असतो. हे म्हणणे खरे आहे की, कापूस मोजल्यानंतर त्याची नोंद मापारी हा त्याच्याकडे असलेल्या रजिस्टर मध्ये घेत असतो. हे म्हणणे खरे आहे की, मापा-याने कापूस मोजल्यानंतर त्याच्या वजनाची एक चिठ्ठी तो व्यापा-याला व एक चिठ्ठी शेतक-याला देत असतो. मी ज्यावेळेस आरोपी क्र. १ ला कापूस विकला त्यावेळेस त्या कापसाची मोजणी मापा-याने केली नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ती मोजणी मी प्लेट काट्याद्वारे केली होती. माझ्या जबाबात आयशर मालवाहू, काटा, मनकी हमाल लोक असे नमूद केले आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ते आले होते परंतु प्लेट काटा झाला होता. मी त्या मापारी आणि हमाल लोकांची नावे सांगू शकत नाही. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, ते चार्वदा येथील लोक होती. हे म्हणणे खरे आहे की, प्लेट काट्यावर वजन करण्यापूर्वी खाली गाडीचे वजन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, माल खाली केल्यानंतर परत त्या गाडीचे वजन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, गाडीचे वजन तीन वेळा केले जाते. या प्रकरणात गाडीचे वजन दोन वेळाच करण्यात आले.

माल कुठे खाली केला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दसरखेड एम.आय.डी.सी. येथे कापसाच्या अनुषंगाने कोणताही उद्योग नाही. हे म्हणणे खरे आहे की, तेथे कोणत्याही व्यापा-याचे खरेदी केंद्र देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्लेट काटा हा दसरखेड येथील कार्तीक पेपर प्रोडक्ट यांचा खाजगी काटा आहे.

प्रश्न-तुम्ही आरोपी क्र. १ ला कापूस ९२ क्वींटल ६० किलो एवढा कापूस दिल्याबाबतचा दस्त तपासीधिका-याला दिला होता का किंवा आजतागायत अभिलेखावर दाखल केला का?

उत्तर- मी शेताचा ७/१२ व काटेपट्टीची प्रत दिली होती.

प्रश्न- तुम्ही आरोपीला ९२ क्वींटल ६० किलो कापूस दिल्याचे अभिलेखावरून दाखवू शकता का?

उत्तर - माझ्या जवळ काटेपट्टी आहे ती मी दाखल केली आहे.

प्रश्न- तुम्ही दाखल केलेल्या काटेपट्टीत वजन हे कापसाचे आहे असे नमूद आहे का?

उत्तर- फक्त वजन आहे. कापूस मोजला असे कुठेही लिहीले नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझे व कार्तिक पेपर मीलच्या मालकासोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे कार्तिक पेपर मीलच्या मालकासोबत असलेल्या चांगल्या संबंधातून मी आजरोजी खोटी काटेपट्टी दाखल केली. खाली गाडीचे वजन केल्याबाबत मी कागद दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ माझ्याकडे वैयक्तीक कधीही आला नव्हता. सरतपासात सांगितलेल्या घटनेबाबत मी वैयक्तीक फिर्याद दिली नव्हती. मी आरोपी क्र. १ ला सदर प्रकरणाबाबत नोटीस देखील दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकुर मी खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०२२-२३ साली माझ्या शेतात ९२ क्वींटल ६० किलो कापूस झाला नाही व मी तो आरोपी क्र. १ ला विकलेला नाही. सन २०२२-२३ मध्ये सी.सी.आय.चे कापसाचे भाव ९८००/- प्रति क्वींटल असल्याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्यापा-यामार्फत जो माल घेतला जातो तो माल जिनींग मालकाला विकते वेळी त्या मालाचे वजन केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, माल मोजल्यानंतर तीन काटेपट्ट्या तयार केल्या जातात, त्या तीन काटेपट्ट्या एक व्यापा-याला, एक शेतक-याला व एक जिनींगच्या मालकाला आवक केल्याबाबत दिली जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....**

०४. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. मी पोलीसांना माल जगन नारखेडेच्या ताब्यात दिल्याचे सांगितले होते. माझ्या जबाबातील क्र. १२ च्या रकान्यात सदर बाब नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो माल कोणाला दिलेला होता ते मला माहीत नसल्यामुळे सदर बाब त्या रकान्यात लिहीण्यात आलेली नाही. मी पोलीसांना बयाण देतेवेळी कापूस हा दसरखेड येथील एम.आय.डी.सी.त काटेपट्टीद्वारे मोजल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ते १४ यांचा माझ्यासोबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार नसून त्यांचा व माझा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ सोडून मी इतर आरोपी क्र. २ ते १४ यांना ओळखत नाही. दाखल केलेल्या काटेपट्टीवर ज्याने कापूस मोजला त्याचे नाव व त्याची सही नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....**

०५. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....**

०६. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....**

०७. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....**

०८. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....**

०९. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....**

१०. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

११. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१२. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.08.25 17:51:26 +0530

दिनांक : २०/०८/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर